माहिती हवीय?

अशोक कोर्टीकर, पंढरपूर.

□ बालगंधर्व, छोटा गंधर्व आणि कुमार गंधर्व यांच खरं नावं काय?

– बालगंधर्व यांचं खरं नाव नारायणराव राजहंस, छोटा गंधर्व यांचं खरं नाव सौदागर आणि कुमार गंधर्व यांचं खरं नाव कोमकली.

सुधाकर कुंभार, इचलकरंजी.

□ गीतकार जगदीश खेबुडकर यांनी कोणकोणत्या चित्रपटाचे कथा-पटकथा-संवाद लिहिले? संगीतकार राम कदम यांच्याबरोबर त्यांनी कोणकोणत्या चित्रपटासाठी काम केलंय?

– १९६९चा वसंत पेंटर यांचा *टिळा लाविते मी रक्ताचा* खेबूडकर यांनी पटकथा-संवाद लिहिलेला पहिला चित्रपट. त्यानंतर अनेक चित्रपटांचे पटकथा-संवाद त्यांनी लिहिले. जागेअभावी त्या सर्वांची नावे येथे देता येणं शक्य नाही. *केला इशारा जाता जाता, शेरास सव्वाशेर, बाई मी भोळी, पाठचा भाऊ, सांगू कशी मी?, अंगाई, एक गाव बारा भानगडी, डोंगरची मैना, जानकी, गणगौळण, गणानं घुंगरू हरवलं, मला तुमची म्हणा, आई उदे ग अंबाबाई, अशी एक रात्र होती, नाते जडले दोन जीवांचे, सोंगाड्या, एकटा जीव सदाशिव, कसं काय पाटील बरं हाय का?, कुंकू माझं भाग्याचं, पाठराखीण, पुढारी, संत तुलसीदास, भोळी भाबडी, हात लाविन तिथं सोनं, मी तुझा पती नाही, सून माझी सावित्री, सुगंधी कट्टा, चंदनाची चोळी अंग अंग जाळी, पिंजरा, झुंज, चोरीचा मामला, फरारी पाहुणी, असला नवरा नको ग बाई, पारध, चांडाळ चौकडी, ईर्षा, कलावंतीण, लक्ष्मी, नेताजी पालकर, सुशीला, आयत्या बिळावर नागोबा, दुनिया करी सलाम, देवापुढे माणूस, पैज, सावज, सहकार सम्राट, सौभाग्यवान, सून माझी लक्ष्मी, तोतया आमदार, दोन बायका फजिती ऐका, गल्ली ते दिल्ली, बाईसाहेब, अत्तराचा फाया, चव्हाटा, गड जेजुरी जेजुरी, गाव तसं चांगलं पण वेशीला टांगलं, बिजली, झेड.पी., लावण्यवती, साईबाबा, पैंजण* हे जगदीश खेबुडकरांचे राम कदमांच्या बरोबरचे चित्रपट.

अभिजित मोरे, नाशिक.

□ ट्विंकल खन्नाचा पहिला चित्रपट कोणता?

– ट्विंकल खन्नाचा पहिला चित्रपट *बरसात.*

भरत कालुवाला, माहीम.

□ मनोजकुमारच्या *पहचान*मधील खलनायक कोण? *जब याद किसी की आती है*मधील खलनायक कोण?

– मनोजकुमारच्या *पहचान*मधील खलनायक शैलेशकुमार. *जब याद किसी की आती है*मधील खलनायक एम. राजन.

उमेश सुर्वे, तुळजापूर.

□ जॉनी लिवरचं खरं नाव काय? चित्रपटात येण्यापूर्वी तो काय करीत होता? त्याचा पहिला चित्रपट कोणता?



पहिला चित्रपट जलवामध्ये रोहिणी हट्टंगडीसह जॉनी लिवर

– जॉनी लिवरचं खरं नाव जॉन राव. चित्रपटात येण्यापूर्वी तो लिवर कंपनीत नोकरी करायचा यामुळेच चित्रपटात येताना त्याने जॉन या आपल्या नावाचे जॉनी केली आणि त्यापुढे लिवर जोडून जॉनी नाव घेतले. त्याचा पहिला चित्रपट *जलवा.*

सोनाली फातर्पेकर, बांबोलीम-गोवा.

□ लता मंगेशकर आणि सुमन कल्याणपूर यांनी एखादं गाणं एकत्र गायलं आहे का?

– १९५९च्या *चांद* या चित्रपटातील 'कभी आज, कभी कल, कभी परसो, ऐसी ही बाते...' हे गाणं लता मंगेशकर आणि सुमन कल्याणपूर यांनी एक गायलं होतं.

□ भारतीय कलाकारांना घेऊन भारतात तयार करण्यात आलेला पहिला इंग्रजी चित्रपट कोणता?

– भारतीय कलाकारांना घेऊन भारतात तयार करण्यात आलेला पहिला इंग्रजी १९४१चा जे.बी.एच. वाडियांचा *राजनर्तकी तथा कोर्ट डान्सर.*

कृष्णा देहेडकर, जालना.

□ रेखाने १९७० ते १९९५ या काळात कोणकोणते चित्रपट केले?

– *सावन भादो*(१९७०), *दोस्त और दुश्मन, एलान, गोरा और काला*(१९७१), *रामपूर का लक्ष्मण, जमीन आसमान, धर्मा, नमक हराम* (१९७२), *कहानी किस्मत की, एक बेचारा, बरखा बहार, हसीनो का देवता, किमत*(१९७३), *अनोखी अदा, आप की खातीर, झोरो, वो मैं नही*(१९७४), *धर्मात्मा, आक्रमण, दफा ३०२*(१९७५), *दो अनजाने, इमान धरम, बाजी, भरोसा, मंगळसूत्र, गाव हमारा शहर तुम्हारा, कबीला*(१९७६), *मुकद्दर का सिकंदर, खून पसीना, गंगा की सौगंध, आलाप, मुकद्दर, दिलदार, प्रेमबंधन, भोले भाले, चक्कर पे चक्कर, सावन के गीत, दुनिया का मेला*(१९७८), *सुहाग, मि. नटवरलाल, कर्तव्य, राम भरोसे, जानी दुश्मन, दो मुसाफिर, फरिस्ता और कातिल, प्राण जाये पर वचन न जाये, राम कसम*(१९७९), फटाकडी(मराठी), *राम बलराम, जुदाई, एक ही भूल, काली घटा, नियत, ॲग्रीमेन्ट, चेहरे पे चेहरा*(१९८०), *सिलसिला, चरणदास, दासी, राम तेरे कितने नाम, उमराव जान, खुबसूरत, कलयुग*(१९८१), *मेहंदी रंग लायेगी, मांग भरो सजना, एक ही रास्ता*(१९८२), *साजन की सहेली, झुठी, अगर तुम न होते, गजब, निशान, प्रेम तपस्या, रास्ते प्यार के*(१९८३), *माती मांगे खून, बिंदिया चमकेगी, आशा ज्योती*(१९८४), *सदा सुहागन, जाल, झुठा सच, फासले*(१९८६), *इन्साफ की आवाज, लॉकेट, अपने अपने*(१९८७), *बीवी हो तो ऐसी, खून भरी मांग, सूरमा भोपाली, इजाजत*(१९८८), *एक नया रिश्ता*(१९८९), *अमीरी गरीबी*(१९९२), *मॅडम एक्स, सौतन की बेटी, मेरा पती सिर्फ मेरा है*(१९९३).

उमेश सुर्वे, तुळजापूर.

□ राजेंद्रकुमारच्या *आस का पंछी* या चित्रपटात त्याच्या डॉक्टर मित्राच्या आईची भूमिका करणारी अभिनेत्री कोण?

– मुमताज बेगम.